# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

रौप्य महोत्सवी वर्ष
१९७९-२००४

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

क्र. मजीप्रा/सस/आरव्या-४/ दिनांक : २४ डिसेंबर , २००४

विषय : **दिनांक २४.११.२००४ रोजी झालेल्या तसेच पुढे ढकललेल्या दिनांक २.१२.२००४ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९९ व्या सभेचे इतिवृत्त.**

दिनांक २४ नोव्हेंबर, २००४ रोजी दुपारी ४.०० वाजता तसेच दिनांक २ डिसेंबर, २००४ रोजी सकाळी ११.३० वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९९ वी सभा संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सोबत सादर करण्यात येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावी, ही विनंती.

**सोबत : इतिवृत्त**

मंत्री/सचि/सान/सेल/नानकपत्र/नर्स/टिप्पणी/ 233 /२००५

(दीपक भसाळे)
सदस्य सचिव

**प्रधान सचिव,**
**पा.पु. व स्व.विभाग**

४/०१/०५

**मा. राज्यमंत्री, नगरविकास**
**तथा उपाध्यक्ष, म.जी.प्रा.**

13/1/05

पापु-३८
20/1/05

**मा. मंत्री,**
**पा.पु. व स्वच्छता**
**तथा अध्यक्ष, म.जी.प्रा.**

20/1/2005

TCM-47

मु. पु. अ.

(महाराष्ट्र शासन उपक्रम)
पाणी हे जीवन आहे! पाण्याची बचत करा!

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९९ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९९ वी सभा मा. मंत्री, ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४ नोव्हेंबर, २००४ रोजी दूपारी ४.०० वाजता आयोजीत करण्यात आली होती. तथापि, मा. अध्यक्ष महोदय यांना तातडीच्या बैठकीकरिता हजर राहावयाचे असल्याने सदरची सभा दिनांक २ डिसेंबर, २००४ रोजी सकाळी ११.३० घेण्याचे ठरले.

त्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९९ वी सभा दिनांक २ डिसेंबर, २००४ रोजी सकाळी ११.३० पार पडली. मा. अध्यक्ष महोदय उपस्थित नसल्यामुळे मा. राज्यमंत्री, नगर विकास तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द उपाध्यक्ष मा. श्री. राजेश टोपे यांच्या अध्यक्षतेखाली सदरची सभा संपन्न झाली. **या सभेस खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते.**

१. श्री. राजेश टोपे, मा. राज्य मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
२. श्री. रणजीत कांबळे, मा. राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष.
३. श्री. जे. एस. सहानी, प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
४. श्री. नानासाहेब पाटील, प्रधान सचिव (२), नगरविकास तथा प्राधिकरणाचे सदस्य.
५. श्री. दीपक भसाळे, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

**या व्यतिरिक्त सदर सभेस खालील मजीप्राचे अधिकारी उपस्थित होते.**

१. श्री. एम. व्ही. दोमकोंडवार, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., औरंगाबाद.
२. श्री. आर. जी. होलानी, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नाशिक.
३. श्री. सागर रानडे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., अमरावती.
४. श्री. हेमंत लांडगे, अधीक्षक अभियंता (समन्वय), म.जी.प्रा., मुंबई.
५. श्री. शेखर गायकवाड, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.
६. श्री. व्ही. आर. कल्याणकर, अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा., ठाणे.
७. श्री. द. चि. सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), मजीप्रा, मुंबई.
८. श्री. बी. एस. पाटील, उप मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

मा. राज्य मंत्री, नगरविकास तथा उपाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. * : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९८ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक ४ ऑगस्ट, २००४ रोजी झालेल्या मजीप्राच्या ९८ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. * : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९८ व्या सभेतील निर्णयांवर करण्यात आलेली कृती.**

या कार्यक्रमबाबीतील मुद्यांवर सर्वसाधारण चर्चेनंतर ९८ व्या सभेतील निर्णयावर केलेल्या कार्यवाहीवर शिक्का मोर्तब करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. १ : म.जी.प्रा.ला योजनांसाठी उपलब्ध निधी व त्यानुसार कामाच्या अंमलबजावणीचे नियोजन आणि त्याकरिता कर्जरुपाने निधी उभारणी..**

सदस्य सचिव यांनी प्राधान्यक्रमानुसार असलेल्या योजना व त्यासाठी लागणारा निधी, उपलब्ध निधी व कमी पडणारा निधी इत्यादीबाबत प्रपत्रात दर्शविल्याप्रमाणे सविस्तर माहिती संचालक मंडळास दिली. यावर, ज्या योजना प्राधान्य क्रम १ अंतर्गत आहेत व ज्या योजना टंचाईग्रस्त भागात आहेत त्या योजनांकरिता प्राधान्याने निधी उपलब्ध करुन देण्यात यावा असे मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा उपाध्यक्ष, म.जी.प्रा. यांनी सूचित केले. मा.उपाध्यक्ष यांनी दिलेल्या सूचनांची नोंद घेऊन प्राधिकरणामार्फत त्याप्रमाणेच कार्यवाही होत असलेबाबत निदर्शनास आणून दिले. म.जी.प्रा.कडे सध्या पूर्णवेळ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी नसल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून दिले. मजीप्रा सारख्या मोठया संस्थेकरिता पूर्णवेळ वि.स. व मु.ले.अ. नसल्याबाबत मा. उपाध्यक्ष यांनी नाराजी व्यक्त करुन हे पद तातडीने पूर्णकाळ पदस्थापनेवर भरणेबाबत शासनास कळवावे असे संचालक मंडळाने सदस्य सचिव यांना निर्देश दिले. मा. प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), यांनी कर्जरोख्याव्दारे प्राप्त झालेला निधी प्राधान्याने वापरण्याबाबतच्या सूचना दिल्या व पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

१) सन २००३-०४ मध्ये रु. २०० कोटी कर्जरोख्याव्दारे ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी निधी उभारण्यासाठी करावयाच्या त्रिपक्षीय करार, विश्वस्त करार व अन्य कायदेशीर व अर्थिक बाबीबाबत पुढील कार्यवाही करणे.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

२) अर्थसंकल्प बाहय तरतुदीच्या मर्यादेमध्ये कर्जरोख्यांव्दारे प्राप्त होणारी रक्कम वगळता उर्वरित रक्कम कर्जरोख्या ऐवजी वित्तीय संस्था / बँका इत्यादिकडून (शासनाने मंजूर केलेल्या मर्यादेपर्यंत) शासन हमीवर व अर्थसंकल्पीय तरतूदीच्या (परतफेडीसाठी) अधीन, कर्जे उभारण्यास त्यासाठी लागणाऱ्या आवश्यक बाबींची पुर्तता करणे.

३) सन २००४-०५ मध्ये हुडकोव्दारे ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी कर्ज उभारण्यासाठी हुडकोशी करावयाचा करार व इतर आवश्यक बाबी पूर्ण करणे.

**कार्यक्रम बाब क्र. २: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या व अस्वीकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करणे.**

अअ(समन्वय)

दिनांक ३.६.१९९८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ८० व्या बैठकीमध्ये प्राधिकरण स्तरावर ज्या निविदा स्वीकृतीचे निर्णय घ्यावयाचे होते अशा निविदांवर तातडीने निर्णय घेण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या ४६ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या तीनही कामांचे निविदा देकार स्वीकृत करणेबाबतच्या निर्णयावर सर्वसाधारणपणे चर्चा करुन शिक्का मोर्तब करण्यात आले. तसेच या स्वीकृतीच्या अधिन राहून पुढील कार्यवाही करण्याकरिता सदस्य सचिव, मजीप्रा, यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ३ : अ) केंद्र शासनाच्या आदेशानुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता मूळ वेतानाच्या ५०% एवढा महागाई भत्ता मूळ वेतनामध्ये विलीन करणेबाबत..**
**ब) ५०% महागाई भत्याचे / महागाई वाढीचे सेवानिवृत्ती लाभांच्या प्रयोजनासाठी विलिनीकरण करणेबाबत..**

मुप्रअ

मा. अध्यक्ष महोदय व प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. हे बैठकीस अनुपस्थित असल्याने सर्वकष चर्चा करण्याकरिता सदरचा विषय हा मजीप्राच्या पुढील बैठकीसमोर ठेवण्यात यावा असे निर्देश मा. अध्यक्ष महोदयांनी दिले.

**कार्यक्रम बाब क्र. ४: माथेरान गिरिस्थान (ता. कर्जत, जि. रायगड) येथिल म.जी.प्रा.च्या पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या दराबाबत..**

रविसमुलेअ

माथेरान पाणीपट्टी दराच्या संदर्भात मा. प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य तसेच सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांनी या केंद्रातून पाणीपट्टीव्दारे मिळणारे उत्पन्न व पाणी पुरवठयासाठी येणारा खर्च यांची सांगड घालून लागू करण्यात

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

आलेल्या पाणीपट्टी दराबाबत संचालक मंडळास अवगत केले. तसेच माथेरान हॉटेल असोसिएशनने पाणीपट्टी दरवाढी विरुध्द उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका फेटाळण्यात आली आहे याबाबतही संचालक मंडळास अवगत करण्यात आले. सदरची याचिका फेटाळल्यानंतरही माथेरान हॉटेल असोसिएशनमार्फत सातत्याने दर कमी करण्याबाबत वेगवेगळया स्तरावर मागणी करत असल्याबद्दलची बाब ही स्पष्ट करण्यात आली. तसेच यापूर्वी एकदा दर कमी करण्यात आले होते. ही बाबसुध्दा संचालक मंडळाच्या निदर्शनास आणण्यात आली. या अनुषंगाने संचालक मंडळाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला.

**मजीप्राकडून सध्या आकारण्यात येत असलेले दरच रास्त आहेत व जोवर म.जी.प्रा.कडे या योजनेची देखभाल-दुरुस्ती राहील तोवर म.जी.प्रा.ने निश्चित केलेले दरच लागू राहतील. जर हे दर माथेरान नगरपरिषद व हॉटेल्स व्यावसायिकांना मान्य नसतील तर त्यांनी या योजनेपोटी त्यांच्याकडे असलेले सुमारे रु. २३८/- लक्ष थकबाकी भरावी व नंतर सदर योजना ताब्यात घेऊन त्यांना योग्य वाटतील ते दर ठरवून त्याप्रमाणे ग्राहकांकडून पाणीपट्टी वसूल करावी असे सर्व संबंधीतांस कळविणेत यावे. तसेच दिनांक ८.७.२००३ च्या बैठकीमध्ये मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, यांनी दिलेल्या सूचनांनुसार प्रत्यक्षात समिती गठीत झालेली नसताना संबंधितांनी समिती गठीत होण्याची वाट न पाहता अनौपचारीक बैठक घेऊन शिफारस केलेले दर मजीप्राच्या उपरोक्त दरापेक्षा कमी व अवाजवी असल्याने मान्य करण्यात येऊ नयेत असे शासनास सदस्य सचिव स्तरावरुन कळविण्यात यावे.**

**कार्यक्रम बाब क्र. ५ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने शिल्लक निधी गुंतविण्यासंबंधी सुधारित मार्गदर्शक तत्वाच्या अनुषंगाने केलेल्या गुंतवणूकीत मान्यता मिळणेबाबत.**

राज्य सार्वजनिक उपक्रमांना त्यांच्याकडे असलेला शिल्लक / अखर्चीत निधी योग्यरित्या गुंतवण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली जातात त्या अनुषंगाने मजीप्रा आतापर्यंत तात्पुरती शिल्लक / अखर्चीत रक्कम, संविधानिक / बंधनकारक स्वरुपाची रक्कम फक्त राष्ट्रीयकृत (Nationalised) बँकांमध्ये व सिकॉमकडे गुंतवणूक करित असते. प्रत्येक वेळी गुंतवणुकीचे प्रस्ताव संचालक मंडळासमोर ठेवणे शक्य होत नसल्याने प्राधिकरणाच्या ९६ व्या बैठकीमध्ये ठरल्यानुसार प्राधिकरणातील शिल्लक / अखर्चीत निधी गुंतवणूकीसंबंधी समिती स्थापन करुन सदर समितीने गुंतवणुकीबाबत घेतलेल्या निर्णयावर व गुंतवणुकीच्या विवरणपत्रास मान्यता देण्यात आली.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

तथापि, मा. प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांनी सदरची गुंतवणूक शेडयुल्ड बँक (Scheduled Bank) ज्यांचे नेटवर्थ (Networth) रुपये १०० कोटी पेक्षा जास्त आहे व कॅपीटल अॅडेक्वेसी रेशीओ (Capital Adequacy Ratio) १०% पेक्षा कमी नाही अशा बँकांमध्ये केल्यास मिळणारे व्याज हे निश्चीतच राष्ट्रीयकृत बँकांकडून मिळणाऱ्या व्याजापेक्षा जास्त असेल व त्यामुळे मजीप्राचा फायदाच होईल. तरी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील तात्पुरती शिल्लक / अखर्चीत रक्कम, संविधानिक / बंधनकारक स्वरुपाची रक्कम फक्त राष्ट्रीयकृत (Nationalised) बँकांमध्ये गुंतवणूक न करता शेडयुल्ड बँकमध्ये देखील (Scheduled Bank) ज्यांचे नेटवर्थ (Networth) रुपये १०० कोटी पेक्षा जास्त आहे आणि त्याची कॅपीटल अॅडेक्वसी रेशीओ (Capital Adequacy Ratio) १०% पेक्षा जास्त आहे अशा बँकांमध्ये करण्यास परवानगीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या वित्त विभागाकडे सादर करण्याबाबत सूचना केली.

**कार्यक्रम बाब क्र. ६ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आस्थापना, हत्यारे व सहनियंत्रणे आकार वाढविणेबाबत..**

विस्मुलेअ

मा. अध्यक्ष महोदय व प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. हे बैठकीस अनुपस्थित असल्याने सर्वकष चर्चा करण्याकरिता सदरचा विषय हा मजीप्राच्या पुढील बैठकीसमोर ठेवण्यात यावा असे निर्देश मा. अध्यक्ष महोदयांनी दिले.

**कार्यक्रम बाब क्र. ७ : प्राधिकरणाच्या लेखा परिक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचेकडे कलम-२० खाली सोपविणेबाबत.. कालावधी १.४.२००२ ते ३१.३.२००७..**

विसमुलेअ

प्राधिकरणाच्या दिनांक २१ जून, २००१ रोजी झालेल्या ९१ व्या बेठकीत ठरल्याप्रमाणे प्राधिकरणाचे सन २००२ ते २००७ चे लेखा परिक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचेकडे Comptroller and Auditor General (Duties, Powers and Conditions of Services) Act-१९७१ मधील कलम-१४ नुसार करुन घ्यावयाचे प्रस्तावित होते. तथापि, शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने लेखा परिक्षण कलम-१४ खाली घेण्याबाबत प्रधान महालेखाकार, लेखा परिक्षण-१, मुंबई यांना विनंती केली असता त्यांनी लेखा परिक्षण कलम-१४ अन्वये घेण्यास असमर्थता दर्शविली आहे. या कलमातील तरतूदीनुसार फक्त जमा व खर्चाची आकडेवारीची तपासणी केली जाईल व प्राधिकरणाचे

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

वार्षिक लेखे प्रमाणित केले जाणार नाहीत असे त्यांनी दिनांक ९.४.२००४ च्या पत्रान्वये कळविले आहे. अशा परिस्थतीत प्राधिकरणाचे लेखे लेखा परिक्षण करुन घेण्यासाठी वेगळा लेखा परिक्षक / सनदी लेखापाल नेमावा लागेल आणि त्यांना वेगळी फी अदा करावी लागेल असे श्री. बी. एस. पाटील, उप मुख्य लेखा अधिकारी यांनी संचालक मंडळासमोर स्पष्ट केले. तसेच शासनाचे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे आदेश दिनांक २२.१.२००३ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००२-२००७ या कालावधीचे लेखा परिक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचेकडे कायद्याच्या कलम-२० (१) नुसार सोपविण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००२-२००७ या कालावधीचे लेखा परिक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचेकडे कायद्याच्या कलम-२० (१) नुसार सोपविल्यास लेखे लेखा परिक्षण प्रमाणीत करुन घेण्यासाठी वेगळा लेखा परिक्षक / सनदी लेखापाल नेमावा लागणार नाही, ही बाब देखील उप मुख्य लेखा अधिकारी यांनी संचालक मंडळासमोर स्पष्ट केली. संचालक मंडळाच्या ९१ व्या बेठकीत घेण्यात आलेला निर्णय रद्द करण्यात येऊन सदर प्रस्तावास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व महालेखाकार, मुंबई यांना विहीत फी अदा करण्यासाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ८ : सोलापूर महापालिकेने त्यांच्या पाणी पुरवठा योजनेसाठी हुडकोकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी म.जी.प्रा.ने कर्जरोखे वितरित करण्याबाबत..**

मुलेअ

सोलापूर महानगरपालिकेने हुडको या वित्तीय संस्थेस देणे असलेल्या रकमेचा वन टाईम सेटलमेंटच्या प्रस्तावास दिनांक २५.१०.२००२ रोजी मंत्री मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार रुपये ५४१०.८० लाखाचे कर्जरोखे वितरीत करण्याकरिता प्राधिकरणाची मालमत्ता गहाण ठेवावी लागणार असल्यामुळे प्राधिकरणाचे हित लक्षात घेऊन सदरचा प्रस्ताव नामंजूर करण्यात आला व याबाबत शासनास अवगत करणेस्तव सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ९ : इगतपूरी पाणी पुरवठा योजना, टप्पा-३, भाग-अ दैनंदिन देखभाल व दुरूस्ती अंतर्गत तळेगाव साठवण तलावाच्या सांडव्याची उंची वाढविण्याबाबत.**

अअ(समन्वय)

इगतपूरी, तालुका इगतपूरी, जिल्हा नाशिक पाणी पुरवठा योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या तळेगाव तलावाच्या सांडव्याची उंची १ मीटरने वाढविल्यास त्याच्या क्षमतेत नव्याने १४० दशलक्ष लिटर इतका वाढीव साठा उपलब्ध होणार असून त्यातून बाष्पीभवन व इतर तुटी

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

वजा जाता ७८ दशलक्ष लिटर निव्वळ जास्तीचा साठा प्रत्यक्ष वापरासाठी उपलब्ध होवू शकेल. इगतपुरी नगरपरिषदेची हद्दवाढ होऊन तळेगाव व गिरनारे ही गावे समाविष्ठ झाल्यामुळे तसेच औद्योगिक वसाहतीत वाढ होत असल्यामुळे एकूण ७८ द.ल.लि. वाढीव पाणी पुरवठा केल्यास प्रचलित दराप्रमाणे रु ९ लक्ष प्रतिवर्ष व ९०% वसुली गृहीत धरुन रुपये ८ लक्ष प्रतिवर्ष इतके वाढीव उत्पन्न मिळेल व त्यातुन या कामावर येणारा संभाव्य खर्च रुपये ११.८५ लक्ष फक्त दीड वर्षात भरुन निघू शकेल असे मुख्य अभियंता, मजीप्रा, नाशिक यांनी स्पष्ट केले. ही बाब विचारात घेऊन रुपये ११.८५ लक्ष किंमतीचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या *Funds for Aug. and Improvement to Board Water works* या शीर्षाखालील शिलकीतुन करण्याच्या बाबीस मंजूरी देण्यात आली व या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार सदस्य सचिव यांना देण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. १०: खनिज विकास निधी अंतर्गत मंजूरी दिलेल्या आणि मजीप्रा मार्फत करावयाच्या पाणी पुरवठा योजनांच्या कामावर लावावयाचे ई.टी.पी. चार्जेस..**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला आस्थापना व अवजारेवर होणारा खर्च ही ई.टी.पी. चार्जेसमधून भागवावा लागतो. गेल्या २/३ वर्षात प्राधिकरणाला ई.टी.पी.व्दारे मिळणारे उत्पन्न व त्यापोटी होणारा खर्च यामध्ये तूट सहन करावी लागत आहे. मात्र याव्दारे मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ करण्याचे दृष्टीने पूर्ण ठेव व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची कामे नागपूर विभागात प्राप्त करुन घेण्यात आली आहेत. सध्या प्रस्तावित असलेल्या उपरोक्त कामासाठी १०% ई.टी.पी. आकारल्यास प्राधिकरणास साधारणपणे रु. १२५.३८ लक्ष रक्कम प्राप्त होणार आहे. सदरहु कामे एकाच जिल्हयात मर्यादित कार्यक्षेत्रात करावयाची असून उपलब्ध यंत्रणे मार्फतच हे काम करणे शक्य आहे. यासाठी नविन कर्मचारीवर्ग नेमणे वा कार्यालयाची स्थापना आवश्यक नाही. निधीची उपलब्धता त्वरेने होणार असल्यामुळे उपलब्ध साधन संपतीचा पूर्णक्षमतेने वापर करणे शक्य होणार आहे. सध्याच्या स्पर्धात्मक जगामधे प्राधिकरणाच्या उत्पन्नात भर घालण्यासाठी अशी किफायतशिर कामे हाती घेणे प्राधिकरणाला क्रमप्राप्त आहे म्हणून सदर प्रकरणी एक खास बाब म्हणून १७.५% ऐवजी १०% ई.टी.पी. चार्जेस आकारणेबाबतची बाब सदस्य सचिव यांनी संचालक मंडळापुढे स्पष्ट केली. त्यास संचालक मंडळाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ई.टी.पी. संदर्भात प्राप्त होणाऱ्या उत्पन्नात वाढ होण्याच्यादृष्टीने खनीजकर्म विभागाचे, खनीज विकास कार्यक्रमांतर्गत चंद्रपूर जिल्हयातील सध्या प्रस्तावित असलेल्या तसेच भविष्यात घ्यावयाच्या पूर्ण ठेव तत्वावरील नळ पाणी पुरवठा

अअ (सामान्य)

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

योजनांसाठी १७.५% ऐवजी १०% ई.टी.पी. चार्जेस आकारणेस एक खास बाब म्हणून मान्यता प्रदान केली. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे सर्वाधिकार सदस्य सचिव यांना प्रदान करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ११: म.जी.प्रा.च्या मालकीच्या मोकळया जागांचा "बांधा, वापरा, हस्तांतर करा" या तत्वावर विकास करणेबाबत..**

मुप्रअ

सदर बाबीवर सर्वकष चर्चा होऊन प्रथम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यातील सर्व जागा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नावावर प्रथम करुन घेऊन नंतरच सविस्तर कार्यक्रम बाब तयार करुन संचालक मंडळापुढे मान्यतेस्तव सादर करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**कार्यक्रम बाब क्र. १२: म.जी.प्रा.च्या पॅनलवरील वकीलांचे मानधनाचे दर निश्चित करणेबाबत..**

मुप्रअ

सदरच्या कार्यक्रम बाबीवर सर्वकष चर्चा होऊन सदरची बाब प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या पुढील बैठकीसमोर चर्चेकरिता ठेवण्यात यावी असे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र. १३: पुणे विद्यापीठ रस्ता रुंदीकरणासाठी मजीप्राचे विश्रामगृह पाडल्यामुळे पुणे येथे नव्याने विश्रामगृह बांधणेबाबत..**

मुप्रअ

सदरच्या कार्यक्रम बाबीवर सर्वकष चर्चा होऊन सदरची बाब प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या पुढील बैठकीसमोर चचर्चेकरिता ठेवण्यात यावी असे ठरले.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. १ : लातूर पाणी पुरवठा योजना, टप्पा-५, कार्यान्वित करणेबाबत..**

**प्रस्ताव क्र. १ :** लातूर पाणी पुरवठा योजना, टप्पा-५, योजना मार्च-२००५ पर्यंत कार्यान्वित करणेसाठी कंत्राटदारास २०% रक्कम विना व्याज प्रदान करणेबाबत.

**प्रस्ताव क्र. २ :** लातूर पाणी पुरवठा योजना, टप्पा-५, योजना मार्च-२००५ पर्यंत कार्यान्वित करणेसाठी कंत्राटदारास अनामत रक्कम प्रदान करणेबाबत.

सदरच्या कार्यक्रम बाबीवर सर्वकष चर्चा होऊन सदरची बाब प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या पुढील बैठकीसमोर चर्चेकरिता ठेवण्यात यावी असे ठरले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

(१०)



**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. २ :**

**वाढीव शिर्डी पाणी पुरवठा योजना, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर.. गट क्र. १ च्या (साठवण तलाव) निविदासाठी पूर्व अर्हता अटी निश्चित करणेबाबत..**

अउ१ (सा.ज.क.२१)

सदरच्या कार्यक्रम बाबीवर सर्वकष चर्चा होऊन वाढीव शिर्डी पाणी पुरवठा योजनेंतर्गत साठवण तलाव बांधण्याच्या कामासाठी कंत्राटदाराची पूर्वअर्हता ठरवित असताना अशा पध्दतीचे काम प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे ज्या ठेकेदाराने केले आहे त्या ठेकेदारांनाच पूर्वअर्हता द्यावी. तसेच या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण / राज्य शासनाच्या पाटबंधारे विभागाकडील योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदार किंवा साठवण तलाव बांधण्याच्या पूर्वानुभव असलेल्या कंत्राटदाराशी जॉईट व्हेंचर केलेल्या कंत्राटदारांनाही पात्र ठरविण्यास शासन मान्यतेने मुख्य अभियंता यांनी केलेल्या कार्यवाहीस येणारे संभाव्य देकार हे स्पर्धात्मकरित्या प्राप्त होतील ही बाब विचारात घेऊन कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात आली. ही मान्यता अशा प्रकारच्या विशिष्ठ कामाबाबत म्हणजेच रस्ते व पुलांकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे अनुभवी कंत्राटदार यांना पात्र ठरवून यापुढेही चालू ठेवावी अशा सूचना निर्गमित करण्यास सदस्य सचिव (तांत्रिक) यांना प्राधिकृत करण्यात आले. तथापि, अशा बदलामुळे येत्या एक वर्षभरात निविदा देकारामध्ये काय बदल घडतो याचा आढावा कार्यक्रम बाबीव्दारे यथावकाश संचालक मंडळासमोर अवलोकनार्थ सादर करण्यात यावे, असे ठरले.

संचालक मंडळासमोर चर्चेकरिता आणखी विषय नसलेमुळे उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे मा. अध्यक्ष यांनी घोषित केले.

**B.M.Min. 96**

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव.
म.जी.प्रा.